# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 05 January 2026

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०५ जानेवारी २०२६ सायंकाळी ६.१०**

****

- महापालिका निवडणूक प्रक्रियेत बिनविरोध निवडीवरून विविध पक्षांमध्ये आरोप प्रत्यारोपाच्या फैरी
- एसटी बस खरेदीची निविदा प्रक्रिया गतिमान करण्याचे परिवहन मंत्र्यांचे निर्देश
- प्रदुषण नियंत्रक 'समुद्र प्रताप' युद्धनौका तटरक्षक दलाच्या ताफ्यात दाखल
- दिल्ली दंगल प्रकरणी उमर खालिद तसंच शरजील इमामची जामीन याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली

आणि

- डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ६६व्या दीक्षांत समारंभात सुमारे ६५ हजार विद्यार्थ्यांना पदवी प्रदान

****

महापालिका निवडणूक प्रक्रियेत बिनविरोध निवडीवरून विविध पक्षांमध्ये आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. भाजप, काँग्रेस, शिवसेना तसंच मनसे आदी प्रमुख पक्षांचे नेते या मुद्यावरून परस्परांवर टीका करत आहेत. बिनविरोध निवडणुकांना विरोध करणाऱ्यांनी योग्य व्यासपीठावर न्याय मागावा असं आवाहन, भाजपा नेते आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलं आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर विमानतळावर वार्ताहरांशी बोलत होते. निवडणूक बिनविरोध होऊ नये, असं कायद्यात लिहिलेलं नाही, निवडणूक आयोगाची देखील याला परवानगी आहे, याकडे बावनकुळे यांनी लक्ष वेधलं.

दरम्यान, महायुतीचे बिनविरोध निवडून आलेले उमेदवार हे लोकप्रियतेमुळे नव्हे तर पैसा आणि धाक दपटशाच्या जोरावर निवडून आल्याची टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. ते मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या कार्यालयात कार्यरत असलेले बहुतांश अधिकारी हे भ्रष्ट असल्याचा आरोपही सपकाळ यांनी केला. या संदर्भातला अहवाल मिळूनही निवडणूक आयोगाने कुठलीही कारवाई केलेली नाही, याप्रकरणी तत्काळ कारवाईची मागणी त्यांनी केली.

****

ठाणे महानगरपालिका निवडणुकीत अर्ज मागे घेणाऱ्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या तीन उमेदवारांविरोधात गुन्हे दाखल करण्याची मागणी माजी खासदार राजन विचारे आणि मनसे नेते अविनाश जाधव यांनी ठाणे पोलिसांकडे केली आहे. यावर निवडणूक आयोगाकडून अहवाल आल्यानंतर कारवाई करू असं पोलिसांनी सांगितलं. सत्ताधाऱ्यांनी सरकारी अधिकाऱ्यांना हाताशी धरून तसंच, पैशांचं आमिष दाखवून या तिघांना उमेदवारी अर्ज मागे घेण्यास भाग पाडल्याचा आरोप विचारे आणि जाधव यांनी केला आहे.

दरम्यान, ठाण्यासह इतर महापालिका निवडणुकांमध्ये बिनविरोध निवडून आलेल्यांच्या निवडीला स्थगिती देण्याची आणि या प्रकरणाची चौकशीची मागणी जाधव यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे.

****

यंदाच्या निवडणुकीत प्रभाग रचना बदलल्यामुळे मतदारांनी एकाचवेळी अनेक उमेदवारांना मतदान करायचं आहे. छत्रपती संभाजीनगर इथं २९ प्रभागांपैकी एक ते २८ प्रभागात प्रत्येकी चार तर २९ व्या प्रभागात तीन उमेदवार निवडून द्यायचे आहेत. या संदर्भात मनपा आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांनी नागरिकांना मतदान प्रक्रियेबाबत माहिती दिली –

**बाईट – मनपा आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत**

मनपा आयुक्तांनी दिलेल्या सविस्तर माहितीची चित्रफीत आपण आमच्या ट्वीटर हँडल तसंच फेसबुक पेजवर पाहू शकता.

****

राज्य परिवहन महामंडळ-एसटीची सध्या सुरू असलेली निविदा प्रक्रिया गतिमान करावी, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. एसटी महामंडळाच्या २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय निधीच्या वापराबाबत आज झालेल्या आढावा बैठकीत सरनाईक बोलत होते. एसटीच्या ताफ्यात या वर्षाअखेरपर्यंत आठ हजार नवीन बसेस दाखल होतील, यापद्धतीने ही निविदा प्रक्रिया राबवावी आदेश सरनाईक यांनी दिले. एसटीच्या विविध विभागांकडून सुरू असलेल्या संथ कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली.

****

मुंबई इथं आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत युनिव्हर्सल म्युझिक ग्रुप आणि एक्सेल एंटरटेनमेंट यांच्यात धोरणात्मक भागीदारी कराराची घोषणा करण्यात आली. हा संगीत क्षेत्रातला जागतिक पातळीवरचा पहिला करार असून, कलाक्षेत्रात आपला ठसा उमटवण्याची इच्छा असलेल्या जगभरातल्या सर्व निर्मात्यांचं महाराष्ट्रात आणि मुंबईत स्वागत असल्याचं फडणवीस यावेळी म्हणाले.

****

देशभरात आज राष्ट्रीय पक्षी दिन साजरा केला जात आहे. पक्ष्यांचं संरक्षण करणं, त्यांच्या नैसर्गिक अधिवासाचं जतन करणं आणि निसर्गातील समतोल कायम राखणं, हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे.

****

देशातली पहिली स्वदेशी बनावटीची प्रदुषण नियंत्रक 'समुद्र प्रताप' युद्धनौका भारतीय तटरक्षक दलाच्या ताफ्यात आज दाखल झाली. गोव्यात झालेल्या या कार्यक्रमाला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह उपस्थित होते. ही युद्धनौका देशाचा सामूहिक दृढनिश्चय आणि आत्मविश्वास यांचं प्रतीक असल्याचं संरक्षण मंत्री म्हणाले. ही नौका प्रवाळ खडक आणि समुद्री जीवांचं रक्षण करेल. सागरी प्रदूषण नियंत्रण नियमन तसंच बचाव आणि शोध मोहीम राबवण्यात देखील ही युद्धनौका उपयोगी पडणार आहे.

****

२०२० सालच्या दिल्ली दंगल प्रकरणातले आरोपी उमर खालिद आणि शरजील इमाम यांची जामीन याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे. या आरोपींविरोधात बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायदा – युएपीए अंतर्गत खटला दाखल होऊ शकतो, असं न्यायालयानं म्हटलं आहे. या प्रकरणातल्या अन्य पाच

आरोपींना मात्र न्यायालयाने जामिन मंजूर केला. फेब्रुवारी २०२० मध्ये नागरिकत्व सुधारणा विधेयकाविरोधात झालेल्या आंदोलनात ५३ जणांचा मृत्यू झाला होता. दरम्यान, या दोन्ही आरोपींना पाठिंबा दिल्याबद्दल काँग्रेस पक्षानं माफी मागावी अशी मागणी भारतीय जनता पक्षानं केली आहे.

****

IRCTC घोटाळ्यात राष्ट्रीय जनता दलाचे नेते लालूप्रसाद यादव यांच्याविरुद्धच्या खटल्याला स्थगिती द्यायला दिल्ली उच्च न्यायालयाने नकार दिला. तसंच, या प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाला उत्तर सादर करण्याचे आदेश दिले. या प्रकरणाची पुढची सुनावणी येत्या १४ तारखेला होणार आहे. गेल्यावर्षी ऑक्टोबर महिन्यात लालू प्रसाद यादव यांच्यासह त्यांच्या पत्नी राबडीदेवी, मुलगा तेजस्वी यादव आणि इतर ११ जणांविरुद्ध फसवणूक, गुन्हेगारी कट रचणं आणि भ्रष्टाचाराच्या खटल्यात आरोप निश्चित करण्यात आले होते.

****

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६६ वा दीक्षांत समारंभ आज कुलगुरू डॉ विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून पुणे येथील 'आयसर' या राष्ट्रीय संस्थेचे संचालक डॉ.सुनील भागवत उपस्थित होते. शिक्षण, संशोधनातून आपल्यात निर्माण झालेल्या क्षमतेचा वापर समाज, मानवतेसाठी करा, असं आवाहन भागवत यांनी यावेळी विद्यार्थ्यांना केलं. या समारंभात ५१ हजार ९४२ जणांना पदवी, १२ हजार ४६५ जणांना पदव्युत्तर पदवी, तसंच २६९ विद्यार्थ्यांना एमफील आणि पीएच.डी प्रदान करण्यात आली.

****

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज महानगरपालिका निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर जालना तसंच परभणी इथं प्रचार सभा घेतल्या. यावेळी परभणी इथं झालेल्या सभेत परभणी महानगरपालिकेंतर्गत महत्त्वाकांक्षी भूमिगत गटार योजना आणि सुधारित पाणी पुरवठा योजनेंतर्गत महानगरपालिकेचा कोट्यवधी रुपयांचा हिस्सा राज्य सरकार भरेल, असं आश्वासन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी बोलताना दिले.

****

केंद्र सरकारने नुकतंच विकसित भारत रोजगार आणि उपजिविका हमी ग्रामीण हे विधेयक संमत केलं आहे. या विधेयकामुळे ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा आणि मुलभूत सेवा अधिक सक्षम होणार आहेत, असं लातूर जिल्ह्याच्या उदगीर तालुक्यातील नागलगाव इथले लाभार्थी संग्राम पवार यांनी सांगितलं. ते म्हणाले –

**बाईट – संग्राम पवार**

****

१९ वर्षांखालील एकदिवसीय क्रिकेट सामन्यात, दक्षिण आफ्रिकेनं भारताला २४६ धावांचं आव्हान दिलं आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या अकरा षटकांत दोन गडी बाद १०३ धावा झाल्या होत्या.

****

राज्यात थंडीचा कडाका काही प्रमाणात कमी झाला आहे. बहुतांश जिल्ह्यांचं किमान तापमान तेरा ते चौदा अंशांवर पोहोचलं असून, फक्त गोंदिया जिल्ह्यात सर्वात कमी साडे दहा अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर तसंच परभणी इथंही किमान तापमान १५ अंश सेल्सियसपेक्षा अधिक नोंदवलं गेलं.

****